ZPAHM - 19024/6/2026-PEDU

R.No-86/2778/2026

श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प
प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि
अहिल्यानगर यांना त्यांचे गैरवर्तनाबाबत
उपाध्यापक या पदावरुन तात्पुरते
स्वरुपात दूर करणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद आदेश जा. क्र. कार्या.२/खाचौ (उ)/१९३/२०२६
अहिल्यानगर दि. - ११ /०३/२०२६.

वाचा:-१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६

२.महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०२५/प्र.क्र. १०/E Office No. १३३९०२०/कार्यासन-३, मुंबई, दि. ९ ऑक्टोबर २०२६.

३.जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील वैदयकिय तपासणी अहवाल पत्र क्र.जि.रु.अ./दिव्यांग/प्र /पुनश्च /तपासणी/पडताळणी/६०३-०७/२०२६ दि. १४/०१/२०२६ व दि १९/०१/२०२६

४.या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटिस जा. क्र. कार्या २/ खा. चौ (उ)/ ६५/२०२६ अहिल्यानगर दि. १०/०२/२०२६.

५. श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांचा खुलासा दि २०/०२/२०२६

६.महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३

७.महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (शिस्त अपिल) नियम १९६४ चे भाग २ मधील नियम ३ (१)(अ)

उपरोक्त संदर्भिय क्र. २ नुसार जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी हे बनावट/ संशयित अथवा लाक्षणिक दिव्यांगत्व (Benchmark Disability) नसलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी अथवा अन्य शासकीय लाभ घेत असल्याबाबत शासनास अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर तक्रारी मध्ये दिव्यांगत्वाचे वैश्विक ओळखपत्र(UDID CARD) बाबत साशंकता व्यक्त केलेली आहे. त्यामुळे सदर दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची (UDID CARD) पडताळणी करणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ मध्ये स्पष्ट केलेल्या तरतुदीनुसार "लाक्षणिय दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तीस अभिप्रेत असलेला कोणताही लाभ सवलत जर अन्य पात्र नसलेल्या व्यक्तीने प्राप्त करुन घेतला किंवा घेण्याचा प्रयत्न केला तर संबंधित व्यक्ती दोन वर्षापर्यत कारावास किंवा रुपये एक लक्ष पर्यंत दंडासाठी किंवा या दोन्ही शिक्षासाठी पात्र ठरतो. त्याच प्रमाणे त्यांनी घेतलेल्या लाभाची वसुली करण्यात यावी. या तरतुदीनुसार पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर

कारवाई करण्यात यावी" असे निर्देश आहेत. यास्तव आरक्षणाअंतर्गत लाभ घेतलेल्या सर्व दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांचे दिव्यांगत्व तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्र/वैश्विक ओळखपत्र (UDID) इत्यादीची पडताळणी करुन त्यांच्या दिव्यांगत्वाबाबत शहानिशा करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र. ३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील अहवालानुसार श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांचे दिव्यांगत्व अल्पदृष्टी- ३० % इतके आढळून आलेले आहे. जे कोणत्याही लाभास पात्र नाही. सदर दिव्यांगत्वाच्या आधारावर नियुक्ती/आंतरजिल्हा बदली/ वाहन भत्ता /आयकर सवलत, व्यवसाय कर सवलत ह्या सवलतीचा लाभ घेतला आहे. त्यामुळे श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा ( वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे.

संदर्भ क्र. ५ अन्वये श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर सादर केलेल्या खुलाश्यानुसार त्यांची नियुक्ती अल्पदृष्टी या दिव्यांग प्रकारातून झाल्याचे नमुद केले आहे. तथापी, पुनश्च तपासणीत दिव्यांगत्व अल्पदृष्टी- ३० % इतके आढळूण आल्याने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ९१ नुसार, जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र ठरत आहे.

त्यानुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ चा भाग दोन पदावरुन तात्पुरते दूर करणे नियम ३ (१) (अ) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशान्वये श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांना आदेशाच्या दिनांकापासुन जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

असेही आदेशित करणेत येते की, हा आदेश अमंलात असेल तेवढया कालावधीत श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांचे निलंबन कालावधीचे मुख्यालय पंचायत समिती, श्रीगोंदा येथे राहील. निलंबन निर्वाह भत्ता हा निलंबन कालावधीत नेमून दिलेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी काढण्यात येईल. तसेच त्यांना निम्न स्वाक्षरीत व्यक्तींच्या पुर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता देण्यात यावेत.

निलंबनाच्या कालावधीत श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये,त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात,तसेच ते निलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.निलंबनाच्या कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल,त्यावेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा

आशयाचे प्रमाणपत्र श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांना सादर करावे लागेल.

निलंबनाच्या कालावधीत श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांना निलंबन निर्वाहभत्ता देण्याबाबतची कार्यवाही गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा -------- जि.अहिल्यानगर हे करतील.

सदर आदेशाची नोंद श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जि. प. अहिल्यानगर च्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळा उपलब्ध करण्यात आला. आहे.
क्र :- 2026031116 00 35

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री विनयकुमार मगण वाडेकर, उपाध्यापक, जि प प्रा शा पाडळी रांजणगांव ता पारनेर जि अहिल्यानगर

द्वारा व प्रत :-गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती पारनेर

२/-सदरचा आदेश संबंधितास बजावून दुस-या प्रतिवर प्रत मिळाली बाबतची तारखेसह स्वाक्षरी घ्यावी व तारखेसह स्वाक्षरी असलेली प्रत त्वरीत इकडेस सादर करावी.

प्रत:-गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती---श्रीगोंदा---------जिल्हा अहिल्यानगर

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर